# <u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ९/२०२४ मधील निशाणी क्र.५ वरील आदेश</u>

अर्जदार नं. १ यांनी जाब देणार क्रं. १ यांचेकडून दरमहा प्रत्येकी रुपये ५०,०००/– प्रमाणे व अर्जदार क्र.२ व ३ यांस २५,०००/– अंतरिम पोटगी मिळणेकरिता प्रस्तुतचा अर्ज सादर केलेला आहे.

**<u>अर्जदाराचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>**–

**०२.** अर्जदार क्र.१ व जाब देणार क्र. १ यांचा विवाह दिनांक ०४/०५/२०२२ रोजी झाला आहे. जाब देणार क्र. १ हे अर्जदार यांची पत्नी आहे. अर्जदार क्र.२ व ३ हे अर्जदार क्र.१ व जाब देणार क्र.१ यांच्या विवाहसंबंधातून जन्माला आलेली २ जुळी मुले आहेत.

**०३.** अर्जदार यांनी जाब देणार क्र. १ याचे विरुध्द कायम पोटगी मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. सदरचा अर्ज चालून त्यावर निर्णय होण्यास बराच कालावधी लागणार आहे. जाब देणार क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ ते ३ यांना दि.२४/०६/२०२४ रोजी भांडण करुन घराबाहेर हाकलून दिले. अर्जदार १ ते ३ हे अर्जदार क्र.१ यांच्या आई वडीलांकडे तिचे माहेरी भोर येथे राहत आहे. जाब देणार १ ते ४ यांनी हाकलून दिल्यापासून अर्जदारांस कोणत्याही प्रकारची पैश्याच्या स्वरुपात अथवा अन्न, धान्याच्या स्वरुपात कोणत्याही प्रकारे मदत केलेली नाही. अर्जदार हिस कोणत्याही प्रकारचे उत्पन्नाचे साधन नाही त्यामुळे अर्जदार हिला आपले अर्जदार क्र. २ व ३ यांचे पालन पोषण करत जीवन जगताना अडचणी येत आहेत. अर्जदार मुला बाळांचा सांभाळ करण्यास असमर्थ आहे.

**०४.** जाब देणार क्र.१ हे पेश्याने वकील असून त्यांचा वकीली व्यवसाय चांगला चालतो त्यामुळे त्यांना सदरच्या व्यवसायापासून दरमहा सुमारे रक्कम रु. २,००,०००/– मिळतात त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थीती ही चांगली आहे त्यांच्यावर कोणीही अवलंबून नाही. तसेच जाब देणार क्र.२ हे देखील पेशाने वकील असून त्यांनाही दरमहा चांगले उत्पन्न मिळते त्यामुळे जाब देणार क्र.१ यांची आर्थिक परिस्थिती चांगली असल्याने ते पोटगी देण्यास सक्षम आहेत.

**०५.** अर्जदार क्र. १ हिने व जाब देणार क्र. १ या दोघांनी आर्थिक परिस्थीती दाखवण्यासाठी Asset & liabilities नि.२२ वर प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच नि. १४ अर्जदार हिने श्रीनाथ एकनाथ वेताळ यांचा मौजे मेरगळवाडी येथील गट क्र.१५/३० चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. सदर जाब देणार क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ ते ३ यांना कोणतीही रक्कम दिलेली नाही. अर्जदार क्र. १ यांना उत्पन्नाचे स्वतंत्र कोणतेही साधन नाही. जाब देणार क्र. १ यांची अर्जदार क्र. १ ते ३ यांच्याप्रती आर्थिक जबाबदारी आहे. जाब देणार क्र. १ यांच्या आर्थिक परिस्थीतीवरुन असे दिसते की, जाब देणार हे अर्जदार क्र. १ ते ३ यांची आर्थिक जबाबदारी घेउ शकतात. सदर अर्ज मंजूर झाल्यास जाब देणार क्र. यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. जाब देणार क्र. १ यांचे त्यांचे जीवनशैलीप्रमाणे अर्जदार क्र. १ ते३ यांना मुलभूत सुविधा पुरवणे बंधनकारक आहे. सबब, अर्जदारांनी अर्जदार क्र.१ हिस अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रुपये ५०,०००/– अंतरिम पोटगी मिळण्यासाठी तसेच अर्जदार क्र. २ व अर्जदार क्र.३ यांना दरमहा पोटगी रक्कम २५०००/– प्रत्येकी जाब देणार क्र. १ यांचे कडून अर्ज दाखल केलेपासून मिळणेसाठी मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**०६.** जाब देणार यांनी त्यांचे म्हणणे **नि.क्र. १६** वर दाखल केले आहे. त्यामध्ये जाब

देणार यांनी अर्जदाराच्या अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. जाब देणार यांचे म्हणणे असे की, अर्जदार क्र.१ हिस मुलीसह कधीही हाकलून दिलेले नाही. उलट अर्जदार ही स्वतःहून कोणतेही संयुक्तिक कारण नसताना जाब देणार क्र.१ यांच्या भांडण करुन स्वतःहून मुलांसहित निघून गेली असल्यामुळे तिला पोटगी मागण्याचा कोणताही संबंध नाही. तसेच तिचे शिक्षण बी.कॉम पर्यंत झाले असून ती माहेरी चांगल्या खाजगी पतपेढीमध्ये काम करुन तिचा उदरनिर्वाह करीत आहे. तसेच तिला शिलाईचे काम देखील येत असल्याने अर्जदार क्र.१ हिस चांगले उत्पन्न मिळत आहे. त्यांना शासकीय योजनेचा देखील लाभ मिळत आहेत. तसेच अर्जदार क्र. २ व ३ हे लहान असल्यामुळे त्यांना या वयात खर्च देखील करावा लागत नाही.

**०७.** जाब देणार यांना वकीली व्यवसायातून २,००,०००/–रु. उत्पन्न मिळत नाही. तसेच अर्जदार यांच्याकडे त्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. जाब देणार यांची वकीलीच सनद ऑगस्ट २०२३ मधील असून ते त्यानंतर ऑल इंडिया बार ए.आय.बी.ची परीक्षा २०२४ मध्ये पास झालेले आहेत. त्यानंतर ते दौंड येथील न्यायालयात मागील एक वर्षापासून शिकण्यासाठी विनामोबदला वरिष्ठ वकीलांकडे ज्युनियरशीप करीत आहेत. त्यामुळे जाब देणार यांना त्यांचा स्वतःचा चरितार्थ चालवण्यास असमर्थ आहेत. त्यांची नव्याने सुरुवात झालेली असल्याने त्यांना त्यांचा महिन्याचा खर्च भागविण्याचे जिकरीचे होत आहे त्यामुळे अर्जदार यांना पोटगी देण्यास असमर्थ आहेत. जाब देणार क्र.२ यांचे सन २०१६ साली शस्त्रक्रिया झाल्यापासून ते कोणतेही शारिरीक व मानसिक काम करण्यास पूर्णतः सक्षम नसल्याने त्यांना सध्या स्थीतीमध्ये उत्पन्नाचा कोणताही स्त्रोत नाही. तसेच त्यांना वयोमानामुळे देखील सध्या त्यांना काम होत नाही. सदर जाब देणार क्र.१ यांचा घर मिळकतीशी कसलाही संबंध नाही अगर त्या त्या फलॅट मिळकतीमध्ये ताबा मागण्याचा कोणताही संबंध नाही. अशाप्रकारे त्यांची आर्थिक

परिस्थिती नाजूक असल्याचे नमूद केले आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा अशी विनंती जाब देणार यांनी केलेली आहे.

**०८.** अर्जातील कथनांवरुन तसेच संचिकेतील कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन करता खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित होतात. सदर प्रश्नबिंदूंचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे.

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदू** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्रं. १ ते ३ हे जाब देणार यांचेकडून अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहेत काय? असल्यास किती ? | अर्जदार क्र.१ ला ५०००/– पोटगी व अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी १,५००/–रुपये पोटगी मंजुर करण्यात येते. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मि मां सा</u>

<u>प्रश्नबिंदू क्र. १ करीता</u> -

**०९.** अर्जदार यांनी आपल्या अंतरिम पोटगी अर्जाचे कथनापुष्टयर्थ प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. अर्जदार यांचे शपथेवरील कथनाप्रमाणे अर्जदार जाबदेणार क्र. १ यांचे विवाह संबंध अस्तित्वात असून अर्जदाराचा त्यांनी कोणत्या ना कोणत्या कारणावरुन वेळोवेळी मानसिक व शारिरीक छळ केलेला आहे. अशा परिस्थितीत अर्जदारास जीवन जगणे अशक्य झाले आहे. जाब देणार यांनी अर्जदार क्र. १ हिस घरातून अर्जदार क्र.२ व ३ सह हाकलून दिले आहे. अर्जदारास कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. जाब देणार क्र.१ यांना उत्पन्नाचे साधन असून त्यांनी

अर्जदारांप्रती असलेली त्यांची नैतिक व कायदेशीर जबाबदारी पार पाडलेली नाही. अर्जदार क्र. २ व ३ हे वय वर्षे १ प्रत्येकी आहेत त्यांना औषध पाणी वेळोवेळी दवाखान्यातून घ्याव्या लागणाऱ्या लस, उपचार व इतर मुलभुत गरजा व पुढे चालू लागणाऱ्या शिक्षणाबाबत कोणतीही आर्थिक जबाबदारी घेतलेली नाही. त्यांनी अर्जदार क्र.१ ची अन्नवस्त्र, औषधोपचार इत्यादी मूलभूत गरजा भागविणेची कोणतीही सोय केलेली नाही. याउलट जाब देणार यांचे प्रतिकथनाप्रमाणे त्यांनी अर्जदारास कोणताही त्रास दिला नसून अर्जदार हीने जाब देणार यांना त्रास देण्याच्या उद्देशाने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे, असे कथन केले आहे.

**१०.** अर्जदार क्र. १ यांना जाब देणार पासून अलिप्त राहाण्याच्या पूर्वीचा घटनाक्रम विचारात घेणे जरुरीचे आहे. त्या अनुषंगाने अर्जदार क्र. १ व जाब देणार एकत्र रहात असताना अर्जदार यांना जाब देणार पासून झालेल्या कौटुंबिक हिंसाचारामुळे अर्जदार क्र. १ यांना जाब देणार पासून अलिप्त राहणे भाग पडले आहे.

**११.** दोन्ही बाजूंची कथने व प्रतिकथने व दाखल केलेले कागदपत्रे विचारात घेता, अर्जदार क्र. १ अर्जदार क्र. २ व ३ यांचेसोबत सध्या त्यांच्या पतीपासून अलिप्त रहात आहेत ही वस्तुस्थिती आहे. कोणतीही भारतीय विवाहीत स्त्री सहनशक्ती पलिकडे त्रास होत असल्याशिवाय पतीपासून अलिप्त रहात नाही. जर तीचे पतीने व पतीचे कुटुंबियांनी अथवा नातेवाईकांनी त्रास देवून वेगळे राहण्यास भाग पाडले तर अशा परिस्थितीमध्येच नाईलाजास्तव विवाहित स्त्रीला तीचे माहेरी रहावे लागते. प्रस्तुत प्रकरणामध्ये देखील अशीच परिस्थिती प्रथम दर्शनी दिसून येते. त्यासाठी अर्जदाराने तसे प्रतिज्ञापत्र ही दाखल केले आहे. अर्जदार या जाब देणार पासून होणा–या मानसिक यातना, भावनिक क्लेश अशा त्रासांसह माहेरी रहात आहेत असे दिसून येते. तसेच दाखल संरक्षण अधिकारी यांच्या अहवालावरुन देखील अर्जदार हिला कौटुंबिक हिंसाचाराला

सामोरे जावे लागल्याचे प्रथमदर्शनी नमूद आहे.

**१२.** जाब देणाराचे कथनाप्रमाणे अर्जदार क्र.१ या पतपेढीमध्ये नोकरीस आहे. परंतु त्याविषयी कोणताही पुरावा जाब देणार यांनी दाखल केलेला नाही. तसेच अर्जदार क्र.१ यांनी जाब देणार क्र.१ हे पेशाने वकील असून त्यांना व्यवसायातून दरमहा रुपये २,००,०००/– दोन लाख रुपये मिळत असलेबाबत कथन केले आहे. जाब देणार यांनी त्यांचा वकीली पेशा असल्याचे मान्य केला आहे परंतु त्यांच्या दरमहा उत्पन्नाविषयी कोणताही दस्त पुरावा दाखल केलेला नाही. अशा परिस्थितीत जाब देणार यांचा वकीली पेशा लक्षात घेता ते उच्चशिक्षीत आहेत. एक मजूर व्यक्ती देखील दरमहा १५ ते २० हजार रुपये कमविण्याची ऐपत ठेवतो. तर या ठिकाणी जाब देणार हे सुशिक्षीत व वकीलाचा पेशा असलेले आहेत. एवढेच नाहीतर जाब देणार यांचय्ा कुटुंबियांच्या नावे शेतजमीनी आहेत. यावरुन त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली आहे असे दिसते.

**१३.** सबब, जाब देणार क्र.१ हे अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे नात्याने वडील असल्याने, अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या पालन पोषणाची जबाबदारी त्यांची आहे. ते ती टाळू शकत नाहीत. अर्जदाराचे हिंसाचाराबाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल आहे. जाब देणार यांनी अर्जदाराचे जगण्याची कोणतीही सोय केल्याचे पटलावर नाही. सबब, कायद्याच्या कलम २३ नुसार अंतरिम पोटगी आदेश पारित करण्यासाठी या बाबी पुरेशा आहेत. जाब देणार क्र. १ हे त्यांच्या पत्नी व मुलांच्या प्राथमिक गरजा भागवणेस समर्थ आहेत.

**१४.** या ठिकाणी संबंधीत कायदयामधील कलम २०(२) या तरतूदीचा विचार करता या कलमाखाली आर्थिक लाभाची रक्कम ही व्यथित व्यक्तीच्या नेहमीच्या राहणीमानाच्या दृष्टीने पुरशी, योग्य आणि वाजवी असली पाहिजे असे नमूद केलेले आहे. अर्जदाराने स्वतःसाठी

५०,०००/– अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी २५,०००/– मागणी कशाच्या आधारे केली आहे हे सांगितलेले नाही. दोन्ही बाजुचे पक्षाने आर्थिक परिस्थीतीबाबत वेगवेगळी कथने केलेली आहे. अर्जदार क्र. २ व ३ चा होणारा खर्च रक्कम कशी ठरविली याविषयी कोणताही पुरावा नाही. अर्जदार या दि.२५/०६/२०२४ पासून भोर या तालुक्याच्या ठिकाणी वास्तव्यास आहेत. शहरापेक्षा तालुक्याच्या ठिकाणी राहणीमानावर गरजावर होणारा खर्च हा काही अंशी महागाई फरकाने कमी असतो. सबब, अर्जदार यांच्या दैनंदिन गरजा, जाब देणार क्र. १ यांचे आर्थिक उत्पन्न, अवलंबित्व तसेच प्रकरणातील सर्व बाबींचा सारासार विचार करता अर्जदार क्र.१ यांना ५०००/– व अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी दरमहा रु. १,५००/– अंतरिम पोटगी मंजूर करणे न्यायोचित होणार होणार आहे. तसेच अर्जदार यांनी मागणी केलेले इतर अनुतोष मूळ अर्जाचे पुराव्यांती विचारात घेणे न्यायोचित होणार आहे. सबब, प्रश्नबिंदू क्र.१ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवून प्रश्नबिंदू क्र.२ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला आहे.

२. जाब देणार क्र. १ सचीदानंद श्रीनाथ वेताळ यांनी अर्जदार क्र.१ दुर्गा सचीदानंद वेताळ यांना दरमहा रक्कम रुपये ५०००/- (अक्षरी रक्कम पाच हजार रुपये फक्त), अर्जदार क्र.२ ओम सचीदानंद वेताळ व अर्जदार क्र.३ शिव सचीदानंद वेताळ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रुपये १,५००/-(अक्षरी रक्कम रुपये एक हजार पाचशे फक्त) इतकी अंतरिम पोटगी प्रस्तुतचा अर्ज दाखल तारीख ३०/०९/२०२४ पासून मूळ अर्जाच्या अंतिम निर्धारणापर्यंत द्यावी.

३. जाब देणार यांनी दरमहा पोटगी यापुढे नियमित भरावी व थकित अंतरिम पोटगी ही सहा टप्पयामध्ये भरावी.

भोर
दि. १२.०३.२०२५.

(नेहा को. नागरगोजे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
भोर.